मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# लम्पीमुळे तीन जनावरांचा मृत्यू; ३० जनावरे बाधित!


## १० दिवसात १५ ते २० जनावरांना लागण

**निगडी। न्यूज एक्स्प्रेस मराठी ।**

पिंपरी-चिंचवड शहरात लम्पीचा प्रादुर्भाव वाढत आहे. शहरात ३० जनावरे लम्पीने बाधित आहेत. गेल्या १० दिवसात ३ जनावरांचा लम्पीने मृत्यू झाला आहे. पशुवैद्यकीय विभागाकडून बाधित जनावरांवार उपचार सुरु आहे. निरोगी जनावरांचे लसीकरण करण्यात येत असल्याचे उपायुक्त संदीप खोत यांनी सांगितले.

जनावरांना होणारा लम्पी हा आजार पुन्हा विषाणूजन्य चर्म रोगाचा प्रादुर्भाव होत असून तो रोखण्याचे आव्हान पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या पशूवैद्यकीय विभागापुढे निर्माण झाले आहे. शहरात मोकाट फिरणारी व पाळीव जनावरांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. लम्पीची साथ नियंत्रणात असली. तरी, मागील १० दिवसांमध्ये जनावरांना लम्पी रोगाची लागण होत असल्याचे आढळून आले आहे. १० दिवसात १५ ते २० जनावरांना लागण झाली आहे. पशुवैद्यकीय विभागाकडून उपचारासाठी एक आणि लसीकरणासाठी एक अशी दोन पथके नियुक्त केली आहेत. त्यांच्यामार्फत जनावरांवर लसीकरण, उपचार सुरु आहे.

बाधित जनावरांच्या गोठ्यात जावून उपचार केले जात आहेत. च-होली, चिखली, मोशी, निगडी या भागात बाधित जनावरे आढळत आहेत. आजपर्यंत बाधित २५० जनावरांचे लसीकरण पूर्ण झाले. ३ हजार जनावरांचे लसीकरण पूर्ण करण्याचे उदिष्ट आहे.



### कशामुळे होतो लम्पी आजार?

» लम्पी आजार हा कॅप्रीपॉक्स विषाणूमुळे होतो. त्यामुळे जनावरांच्या अंगावर १० ते २० मि.मी. व्यासाच्या गाठी येतात. सुरुवातीस भरपूर ताप येतो. डोळ्यातून नाकातून चिकट स्त्राव सुरु (झळार्िळ) होतो. चारा पाणी खाणे कमी अथवा बंद होते. दूध उत्पादन कमी होते. काही जनावरात पायावर सूज येणे व लंगडणे, असे प्रकार घडतातलम्पी आजार संक्रमण होणारा रोग आहे. डास, चावणाऱ्या माश्या, गोचिड, चिलटे, बाधित जनावरांचा स्पर्श, दुषित चारा-पाणी यामुळे हा आजार जोरात फैलावतो. त्यामुळे पशुपालकांनी चारा कमी खाणाऱ्या जनावरांचा तात्काळ ताप मोजावा व नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्याशी संपर्क साधून उपचार करुन घ्यावेत.

### महापालिकेचे आवाहन

» बाधित जनावरे निरोगी जनावरांपासून वेगळी ठेवावीत, कोणत्याही संभाव्य रोगी जनावरस निरोगी जनावरांच्या कळपात प्रवेशास बंदी घावावी, रोग प्रादुर्भाव झालेल्या गावातील बाधित जनावरांना चराऊ कुरणांमध्ये एकत्रित सोडण्यास मनाई करावी, डांस, माश्या, गोचिड व तत्सम कीटकांचा पशुवैद्यकाच्या सल्ल्याने औषधांचा वापर करुन बंदोबस्त करावा, असे आवाहन उपायुक्त खोत यांनी केले आहे. पशुवैद्यकीय विभागाचे उपायुक्त संदीप खोत म्हणाले, मागच्या आठवड्यात निगडीत लम्पीची लागण झालेली गाय निदर्शनास आली होती. तिला लम्पीचा आजार नव्हता. गायचे पोट फुगले होते. टीम पाठवून औषध उपचार केले. नेहरुनगर येथे गायीला आणले होते. शहरात लम्पी महिन्यापासून सुरु आहे. उपचार करत आहोत. तीन जनावरांचा आजपर्यंत मृत्यू झाला आहे. दोन शेतक-यांच्या गायी आणि एक भटकी आहे. ३० जनावरे बाधित आहेत. चिखली, च-होली परिसरात जनावरे जास्त आहेत.

# मोशीतील शिवरस्त्याची वाट 'वाकडी'!

## नागरिकांना मनःस्ताप : महापालिका प्रशासनाचे दुर्लक्ष

**मोशी । न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

मोशी येथील शिवररस्त्याच्या अंतर्गत रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून, या मार्गावरुन वाट काढताना नागरिक, वाहनचालकांना नाहक मन:स्ताप सहन करावा लागत आहे. रस्त्याच्या दुरावस्थेकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांनी दाद कुणाकडे मागावी? असा प्रश्न निर्माण झाला आहे.

मोशी शिवरस्त्यावरील पार्कलॅन्ड, क्वीन्सलॅन्ड, डिवाईन व उटोपिया, बालाजी विश्व या सोसायटींमधील नागरिकांना शिवरस्त्याने प्रवास करावा लागतो. मात्र, या रस्त्यावर मोठे खड्डे पडले आहेत. त्यामध्ये पावसाचे आणि सांडपाणी साचल्यामुळे दुर्गंधी येत आहे.

गेल्या २ महिन्यांपासून शिवरस्त्यावरील रामा बारकोड साईटजवह पाणी साचून नागरिकांच्या आरोग्याचा व रहदारीचा प्रश्न ज्वलंत झाला आहे. वारंवार तक्रार करुनही तात्पूर्ती कार्यवाही केली जात आहे. मात्र, समस्या जैसे थे असून, प्रशासन वेळकाढूपणा करीत आहे.





"स्थानिक नागरिकांना रहदारीसाठी असलेला शिवरस्ता हा अत्यंत खराब झाला आहे. खड्डे आणि खडी यामुळे ठिकठिकाणी डबकी साचली आहेत. दुचाकीस्वार घसरून पडण्याच्या घटना आहेत. याबाबत प्रशासनाने गांभीर्याने लक्ष घालण्याची आवश्यकता आहे. अन्यथा स्थानिक नागरिकांना सोबत घेवून आम्ही आंदोलनात्मक भूमिका घेणार आहे.

-ज्ञानेश्वर बोऱ्हाडे, सामाजिक कार्यकर्ते



"शिवरोडवरील अंतर्गत रस्ता खराब झाल्याने बसची कनेक्टीव्हीटी नसल्याने विद्यार्थ्यांना नागरिकांना चासत जाताना खूप त्रास होतो. दुचाकी चालवताना तारेवरची कसरत करावी लागते. जेवढा रस्ता ताब्यात आहे, तेवढा करावा.

-रवींद्र भोसले, क्वीन्सलॅन्ड सोसायटीतील नागरिक



"मोशी-बोऱ्हाडेवाडी, शिवरस्ता परिसरातील काही रस्ते महापालिकेच्या ताब्यात नाहीत. त्यामुळे त्याचे कामकाज कसे करायचे हा प्रश्न आहे. जे ताब्यात आहेत, त्याची कामे सुरु केली आहेत.

-देवन्ना गट्टुवार, कार्यकारी अभियंता क प्रभाग

# कचरा केंद्राचे काम मोशीमध्ये थांबवले!

## परिसरातील सोसायटीधारकांना दिलासा

**पिंपरी-चिंचवड | न्यूज एक्सप्रेस मराठी|** मोशी येथील सिल्वर-९ सोसायटीजवळ महापालिका कचरा संकलन केंद्र उभारणार होती. त्याचे काम थांबवण्याचा निर्णय प्रशासक शेखर सिंह यांनी बुधवारी घेतला. त्यामुळे परिसरातील सोसायटीधारकांना दिलासा मिळाला आहे.

चिखली-मोशी-चऱ्होली पिंपरी-चिंचवड हाउसिंग सोसायटी फेडरेशनचा कचरा संकलन केंद्राला विरोध आहे. या भागात पाच हजारांवर लोकवस्ती आहे. त्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण करू नये, अशी मागणी करून फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे यांनी आंदोलनाचा इशारा दिला होता. दरम्यान, फेडरेशनच्या पदाधिकाऱ्यांनी आमदार महेश लांडगे यांची भेट घेतली. त्यांनीही 'लोकवस्तीत कचरा संकलन केंद्र नको,' अशी सूचना सिंह यांना केली होती. त्यानंतर प्रशासनाने तीन पर्यायी जागा शोधून कार्यवाही सुरू केली.

त्यामुळे सिल्वर ९ सोसायटीजवळील प्रस्तावित कचरा संकलन केंद्राचे काम थांबविण्याचा निर्णय घेतला आहे. सांगळे म्हणाले, ''लोकवस्तीत कचरा संकलन केंद्र उभारू नये, अशी आमची मागणी होती. प्रशासनाने केंद्र बांधणीचे काम थांबवले असून, जागा बदलण्यात येणार आहे.''



> **"कचरा संकलन केंद्रामुळे दुर्गंधीचा त्रास नागरिकांना सहन करावा लागला असता. महापालिकेने कासारवाडी आणि गवळीमाथा येथे कचरा संकलन केंद्र प्रायोगिक तत्त्वावर उभारले आहे. त्या ठिकाणी लोकवस्ती नाही. त्यामुळे सिल्व्हर-९ सोसायटीलगतचे प्रस्तावित केंद्र रद्द करण्याची सूचना प्रशासनाला केली होती.**
> **- महेश लांडगे, आमदार, भोसरी**

# शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने पवनामाईचे जलपूजन

## नागरिकांना अखंडपणे पाणीपुरवठा व्हावा अशी प्रार्थना

**पिंपरी-चिंचवड | न्यूज एक्सप्रेस मराठी|** पिंपरी चिंचवड शहरातील बहुतांशी भागाला पाणीपुरवठा पवना धरणातून करण्यात येतो. हे पवना धरण दोन दिवसापूर्वी शंभर टक्के भरले आहे. बुधवारी (दि.२३) शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पिंपरी चिंचवड शहर प्रमुख ॲड. सचिन भोसले यांच्या हस्ते पवना धरण येथे पुष्पहार अर्पण करून जलपूजन करण्यात आले. तसेच महिला पदाधिकाऱ्यांच्या हस्ते पवना माईला साडी, चोळी व श्रीफळ अर्पण करून शहरातील नागरिकांना अखंडपणे पाणीपुरवठा व्हावा अशी प्रार्थना करण्यात आली.

यावेळी ॲड. सचिन भोसले म्हणाले की, मागील साडेचार वर्षापासून पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांना दिवसाआड पाणीपुरवठा करण्यात येत आहे. दरवर्षी पवना धरण शंभर टक्के भरत असताना देखील शहरातील नागरिकांना प्रशासनाच्या गलथान कारभारामुळे व सत्ताधारी भाजपचे पदाधिकारी आणि आयुक्तांच्या आडमुठ्या धोरणामुळे पाणी समस्या उद्भवत आहे. आता तरी आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी हेखेखोरपणा सोडून दररोज संपूर्ण शहराला २४ तास पूर्ण दाबाने आणि शुद्ध पाणीपुरवठा करावा अशी सद्बुद्धी पवना माईने द्यावी अशी प्रार्थना करण्यात आली. यावेळी रोमी संधू, हाजी दस्तगीर मनियार आणि निलेश मुटके उपजिल्हा प्रमुख, अनिताताई तुतारे महिला शहर संघटीका, तुषार नवले पिंपरी विधानसभा प्रमुख, अनंत कोऱ्हाळे चिंचवड विधानसभा प्रमुख, वैशाली कुलथे पिंपरी महिला संघटीका, कल्पना शेटे भोसरी महिला संघटीका, संतोष वाळके शहर संघटक, संतोष सौंदनकर शहर संघटक, विजय गुप्ता पिंपरी शहर संघटक, दिलीप भोंडवे शहर संघटक, पांडुरंग पाटील उप शहर प्रमुख, हरेश नखाते उप शहर प्रमुख, नेताजी काशीद उप शहर प्रमुख, श्रीमंत गिरी उप शहर प्रमुख, अनिल सोमवंशी उप शहर प्रमुख, सुधाकर नलावडे उप शहर प्रमुख, युवराज कोकाटे उप शहर प्रमुख, शैलेश मोरे उप शहर प्रमुख, दादा नरळे शहर संघटक, रजनी वाघ उप शहर प्रमुख, विभाग प्रमुख संदीप भालके, नितीन बोंडे, दत्ताराम साळवी, गोरख नवघणे, चंद्रकांत शिंदे, सचिन चिंचवडे, गोरख पाटील, विठ्ठल कळसे, बेबी सय्यद, मंजुषा जोशी, पूनम रिटे, नीता शिंदे, मंदा फड, कमल गोडांबे, गीताताई कुसाळकर, उप विभाग प्रमुख पुरुषोत्तम वाईकर, दत्ता केदारी, दादाराव ठाकरे, नरसिंग माने, शाखा प्रमुख विजय चव्हाण, शिवसैनिक गजानन धावडे, विजय दर्शिले, प्रवीण राजपूत, राजेंद्र सिंग राठोड व बहुसंख्य शिवसैनिक आदी उपस्थित होते.



# विज्ञान केंद्रामध्ये उत्सुकता अन् जल्लोष

**पिंपरी-चिंचवड | न्यूज एक्सप्रेस मराठी|** चांद्रयान-३ च्या लँडिंगबाबत असलेली उत्सुकता, काऊंटडाऊन सुरू झाल्यावर रोखले गेलेले श्वास व यशस्वी लँडिंगनंतर नागरिकांनी केलेला जल्लोष, 'भारत माता की जय' अशा दिलेल्या घोषणा असे उत्साहपूर्ण वातावरण पिंपरी चिंचवडमधील विज्ञान केंद्रामध्ये पाहायला मिळाले. चांद्रयान- ३ विषयी सोप्या भाषेत माहिती देण्यासाठी पिंपरी चिंचवड विज्ञान केंद्रातील तारांगण सभागृह येथे बुधवारी सायंकाळी विशेष सत्राचे आयोजन केले होते. त्यानंतर चांद्रयान ३ मोहिमेच्या शेवटच्या टप्प्याचे थेट प्रक्षेपण उपस्थितांना दाखविण्यात आले. लहान मुलांपासून ते मोठ्यांपर्यंत सर्व वयोगटातील नागरिक यावेळी उपस्थित होते. बरोबर सहा वाजून चार मिनिटांनी चांद्रयानचे चंद्राच्या पृष्ठभागावर यशस्वी लँडिंग झाले आणि उपस्थितांनी एकच जल्लोष केला. 'भारत माता की जय', 'वंदे मातरम्' अशा घोषणांनी नागरिकांनी सभागृह दणाणून सोडले.

लँडिंगच्या दोन महिने आधीपासूनच विज्ञान केंद्रामध्ये विद्यार्थ्यांसाठी चंद्रयान -३ मोहिमेची माहिती देणाऱ्या कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले होते. मोहिमेविषयी सर्व माहिती विद्यार्थ्यांना मिळाल्यामुळे आजच्या लँडिंगविषयी सर्वांमध्ये उत्सुकता होती.

> **"चांद्रयान - ३ नक्की काय आहे ? या मोहिमेचा उद्देश काय आहे ? याची माहिती देण्यासाठी आम्ही दोन कार्यशाळा घेतल्या. विद्यार्थ्यांनीही याला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. आज चंद्रयान - ३ चे यशस्वी लँडिंग झाले याचा आनंद आहेच मात्र विद्यार्थ्यांना याबाबत अधिक उत्सुकता आहे, याचे समाधान आहे.**
> **- नंदकुमार कासार, मुख्य कार्यकारी अधिकारी**

# पालिकेकडून एक कोटींच्या कामांना मंजुरी!

## उरुळी देवाची, फुरसुंगीमध्ये विकासकामे सुरू करण्याचा निर्णय

पुणे।
न्यूज एक्सप्रेस मराठी।
उरुळी देवाची आणि फुरसुंगी या गावांमध्ये पुन्हा विकासकामे सुरू करण्याचा निर्णय महापालिका प्रशासनाने घेतला आहे. त्यानुसार या दोन्ही गावांमध्ये एक कोटीपर्यंतची विकासकामे करण्यात येणार आहेत. महापालिकेच्या वित्तीय समितीनेही या कामांना मान्यता दिल्याने येत्या काही दिवसांत निविदा प्रक्रिया राबविली जाणार आहे. त्यामुळे या दोन्ही गावांतील विकासकामांना गती मिळणार आहे. उरुळी देवाची आणि फुरसुंगी या गावांचा ऑक्टोबर २०१७ मध्ये महापालिका हद्दीत समावेश करण्यात आला होता. त्यानंतर महापालिका प्रशासनाकडून दोन्ही गावात विकासकामे सुरू करण्यात आली होती. गेल्या पाच वर्षांत




### प्रादेशिक विकास योजनेलाही गती

» फुरसुंगी आणि उरुळी देवाची या दोन गावांत मिळकतकर आकारणी चुकीच्या पद्धतीने झाली असल्याने लाखो रुपयांची थकबाकी निर्माण झाली आहे. त्या विरोधात नागरिकांनी तक्रारी केल्या. शिवसेना शिंदे गटाचे माजी आमदार विजय शिवतारे यांनी गावे वगळण्याबाबत आग्रही भूमिका घेतली होती. त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गावे वगळण्याचा आणि या दोन्ही गावांची मिळून नगर परिषद करण्याचा निर्णय जाहीर केला होता. मात्र आता या गावांमध्ये रस्ते, सांडपाणी वाहिन्या तसेच अन्य पायाभूत सुविधांची कामे केली जाणार आहेत. रखडलेल्या प्रादेशिक विकास योजनेलाही गती मिळण्याची शक्यता आहे.

सुमारे २५० कोटी रुपये या गावांमध्ये खर्च झाले आहेत. तसेच ३९२ कोटी रुपयांच्या मल:निसारण प्रकल्पामध्ये या दोन्ही गावांमध्ये सुमारे ४२ कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत.

या दोन्ही गावांत ३७१ हेक्टरची टीपी स्कीम शासनाने मंजूर केली आहे. महापालिका हद्दीतून उरुळी देवाची आणि फुरसुंगी गावे वगळण्यासंदर्भातील प्रारूप अधिसूचना राज्य शासनाच्या नगरविकास विभागाने जानेवारी महिन्यात काढली होती. या दोन्ही गावांची मिळून नगरपरिषद करण्याचे प्रस्तावित होते. त्यासंदर्भात राज्य शासनाकडून महापालिकेला अभिप्राय विचारण्यात आला होता. गावे वगळण्यास हरकत नसल्याचा अभिप्राय महापालिकेने दिल्यानंतर त्याबाबतच हरकती-सूचना मागविण्यात आल्या होत्या. त्याचा अहवाल नगरविकास विभागाला पाठविण्यात आला आहे. गावे वगळण्याबाबतची अधिसूचना प्रसिद्ध झाल्यानंतर महापालिका प्रशासनाकडून या दोन्ही गावांतील विकासकामे थांबविण्यात आली होती. गावांचा विकास खुंटल्याची तक्रार सातत्याने होत असल्याने या गावांमध्ये विकासकामे करण्यासंदर्भातील चर्चा सुरू झाली होती. त्यातच महापालिका हद्दीत गावे वगळण्यात आलेली नाहीत आणि कायदेशीर बाबी तपासूनच गावे वगळण्यासंदर्भातील निर्णय घेतला जाईल, अशी हमी राज्य शासनाच्या नगरविकास विभागाने दिल्याने विकासकामे करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे.

# गुंठेवारीतील बांधकामे नियमित करण्यासाठी पुन्हा मुदतवाढ!

## ३१ डिसेंबरपर्यंत नागरिकांना करता येणार अर्ज

पुणे ।
न्यूज एक्सप्रेस मराठी।
गुंठेवारीतील बांधकामे नियमित करण्यासाठी प्रतिसाद मिळत नसल्याने पुन्हा मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव बांधकाम विभागाने महापालिका आयुक्त कार्यालयाला दिला आहे. आयुक्तांच्या मंजुरीनंतर या मुदतवाढीचा निर्णय होणार आहे. शहरामध्ये अर्धा गुंठा, एक गुंठा आणि दोन गुंठे अशा जागांवर छोटी-छोटी बांधकामे करण्यात आली आहेत.

ही संख्या जवळपास ७० हजारांच्या आसपास असल्याची नोंद



महापालिकेच्या बांधकाम विभागाकडे आहे. राज्य शासनाने गुंठेवातीतील बांधकामे नियमित करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार २०२१ पासून ही प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. मात्र कागदपत्रांची पूर्तता, आकारले जाणारे शुल्क तसेच किचकट नियमांमुळे बांधकामे नियमित करण्यास अपेक्षित प्रतिसाद मिळालेला नाही. महापालिकेकडे गुंठेवारीसाठी ८५६ अर्ज दाखल झाले होते. त्यातील केवळ २१ प्रकरणे मंजूर झाली असून, ५४७ प्रकरणे फेटाळण्यात आली आहेत. तर २८९ प्रकरणे मान्यतेच्या प्रक्रियेत आहेत. दरम्यान, महापालिका प्रशासनाकडून या योजनेसाठी ३१ जुलै २०२३ पर्यंतची मुदतवाढ देण्यात आली होती. ती संपल्यामुळे गुंठेवारीतील बांधकामे नियमित करण्यासाठी मुदतवाढ देण्याची मागणी राजकीय पक्षांकडून करण्यात आली होती.

त्यानुसार अर्ज करण्यासाठीची मुदत चार महिन्यांनी वाढविली असून, येत्या ३१ डिसेंबरपर्यंत नागरिकांना अर्ज करता येणार आहेत. तसा प्रस्ताव आयुक्त कार्यालयाला देण्यात आला आहे.


# शेतकरी वाहनचालकांची पुणे बाजार समितीत लूट

पुणे ।
न्यूज एक्सप्रेस मराठी।
पुणे बाजार समितीत ठेकेदारांकडून 'वाहन प्रवेश फी'च्या नावाखाली शेतकरी वाहनचालकांची लूट सुरू आहे. बाजारातून शेतमालाची रिकामे वाहन बाहेर पडत असताना प्रत्येक वाहनचालकाकडून दहा ते पन्नास रूपयापर्यंत शुल्क घेतले जात आहे. तसेच त्यांना कोणतीही पावती दिली जात नाही. त्यामुळे होणारी लूट थांबणार का? असा प्रश्न वाहन चालकांकडून उपस्थित केला जात आहे. गुलटेकडी मार्केटयार्डातील फळे-भाजीपाला, कांदा-बटाटा, केळी बाजारात शेतमाल घेऊन येणाऱ्या वाहनांना 'वाहन प्रवेश फी' आकारली जात नाही. परंतु भुसार विभागातील गेट नं. ५ मधून बाहेर पडणाऱ्या शेतमालाच्या वाहनांकडून पैसे आकारले जात आहेत. याकडे समितीने दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे संचालक मंडळ आल्यानंतरही शेतकऱ्यांची होणारी लूट काही केल्या थांबत नाही. तसेच गुळ-भुसार बाजारात खरेदीसाठी येणार्या चारचाकी वाहनांना पार्किंग शुल्क आणि वाहन प्रवेश फी असे दोन्ही शुल्क आकारले जाते. बाजारात दररोज सुमारे हजार ते दीड हजार वाहने येतात. प्रतिवाहन दहा रूपयेनुसार रोज दहा ते पंधरा हजार रुपये जमा होत असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे हे जमा होणारे पैसे नक्की कुठे जातात असा प्रश्न उपस्थित झाला आहे. भुसार बाजारात 'वाहन प्रवेश फी'साठी पहिल्या पाच तासांसाठी १० रूपये त्यानंतर पाच तासानंतर प्रतितास दहा रूपये असे शुल्क निश्चित केले असताना बाजारात येणार्या वाहनांकडून प्रवेश फीच्या नावाखाली तीस रूपयांपासून काही चालकांकडून अगदी दोनशे रूपये शुल्क घेतले जात असल्याच्या घटना वारंवार घडत आहेत.

# चांद्रयान-३ च्या यशस्वितेसाठी प्रार्थना!

## जेजुरी गडावरील विश्वस्त आणि भाविकांनी केला भव्य अभिषेक

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** भारताची सर्वात महत्वाकांक्षी अंतराळ मोहीम संपूर्ण यशस्वी व्हावी, यासाठी देशात ठिकठिकाणी प्रार्थना केल्या जात आहेत. त्याचप्रमाणे अनेक मंदिरांमध्ये पूजा, यज्ञ, होम, अभिषेक केले जात आहेत. पुण्याजवळ असलेले आणि लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या जेजुरीच्या श्रीखंडेरायाला देखील बुधवारी दुपारी चांद्रयान मोहीम यशस्वी व्हावी, या भावनेने साकडे घालण्यात आले. ऐतिहासिक दृष्ट्या महत्वाची असलेली



भारताची चांद्र मोहीम बुधवारी सायंकाळी यशाच्या टप्प्यात आहे. सार्या जगाचे लक्ष या चांद्रयान मोहिमेने वेधून घेतले आहे. ही मोहीम यशस्वी झाल्यास भारत हा चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर पाऊल ठेवणारा जगातला पहिला देश ठरणार आहे. तसेच ही मोहीम यशस्वी ठरली तर अमेरिका, रशिया आणि चीन या देशांच्या पंक्तीत बसायचे भारताचे स्वप्न साकार होणार आहे. त्यामुळे भारतीय अवकाश संशोधन संस्था इस्रोच्या या चांद्रयान मोहिमेला अंतिम टप्प्यात परमेश्वरी आशीर्वाद मिळावेत, या भावनेने जेजुरी गडावर श्रीखंडेरायाला विधिवत मंगल अभिषेक घालून पूजा करण्यात आली. याप्रसंगी जेजुरी देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त, पदाधिकारी आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

चंद्रयान ३ मोहीम यशस्वी होण्याकरिता बुधवारी दुपारी जेजुरी गडावर खंडेरायाला अभिषेक घालण्यात आला. विधिवत पूजा करून ही मोहीम यशस्वी करण्याकरिता प्रार्थना करण्यात आली. यावेळी देवसंस्थानचे विश्वस्त मंडळातर्फे विश्वस्त अनिल रावसाहेब सौंदडे यांचे हस्ते अभिषेक करण्यात आला, अशी माहिती जेजुरी देवस्थान ट्रस्टच्या वतीने देण्यात आली. चांद्रयान मोहिमेच्या प्रत्यक्ष लँडिंगच्या अंतिम घटिका सायंकाळी ५ वाजून २३ मिनिटांनी सुरू होणार आहेत. त्याआधी जेजुरी गडावर हे धार्मिक विधी संपन्न करण्यात आले.

# भरदिवसा फिल्मी स्टाईल गोळ्या झाडून हत्या!

## पोलिसांचा फौज फाटा घटनास्थळी दाखल

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पिंपरी-चिंचवडमध्ये भर दिवसा एका व्यक्तीची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली आहे. ही घटना पाचच्या सुमारास घडली. या घटनेमुळे पिंपरी-चिंचवड शहरात एकच खळबळ उडाली आहे. फिल्मी स्टाईल घडलेल्या घटनेमुळे नागरिकांमध्ये भीतीच वातावरण आहे. एकाच मोटारीतून निघालेल्या व्यक्तींचे आपापसात झालेल्या वादातून सागर शिंदे याची गोळ्या झाडून हत्या केली. अद्याप नेमकं कारण समोर आलेलं नाही. यावर पोलिस देखील बोलण्यास टाळाटाळ करत आहेत. त्या वाहनाने काही गाड्यांना धडक दिली. औंध- रावेत बीआरटी मार्गावर असलेल्या रक्षक चौकाजवळ ही घटना घडली आहे. भर दिवसा घडलेल्या घटनेमुळे भीतीच वातावरण काही काळ निर्माण झालं होतं. अज्ञात हल्लेखोरांचा शोध सांगवी पोलीस घेत आहेत. घटनेची



माहिती मिळताच पोलीस उपायुक्त काकासाहेब डोळे, सहायक पोलीस आयुक्त विशाल हिरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीराम पौळ यांच्यासह पोलिसांचा फौज फाटा घटनास्थळी दाखल झाला होता.

### नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

**» भर दिवसा घडलेल्या या घटनेमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. अशा प्रकारे आरोपींकडे पिस्तूल येतात कुठून असा प्रश्न विचारला जात आहे. भर दिवसा घडलेल्या घटनेमुळे पिंपरी- चिंचवड शहरातील नागरिक सुरक्षित आहेत का? असाही प्रश्न उपस्थित होतो आहे. हत्येच्या गुन्ह्यातील मुख्य सूत्रधार योगेश जगताप याला गुंड विरोधी पथकाने अवघ्या काही तासातच ताब्यात घेतलं आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार, हत्या झालेला सागर शिंदे मोटारीतून त्याच्या काही साथीदारांसह जगताप डेअरी च्या दिशेने जात होते. दरम्यान, धावत्या मोटारीमध्येच सांगवी पुलावर त्यांच्यात वाद झाले. अशी माहिती सूत्रांनी दिली. चालकाचे गाडीवरील नियंत्रण बिघडले. काही वाहनांना धडक देऊन गाडी तशीच पुढे गेली. रक्षक चौकाच्या जवळ जाताच गाडी पंक्चर झाली आणि या गाडीतून सागर शिंदे हा जीव वाचवण्यासाठी सैरावैरा धावायला लागला. तेव्हा, त्याच्या पाठीत अज्ञात व्यक्तीने गोळी झाडली. हा सर्व फिल्मी स्टाईल थरार भर दिवसा आणि वाहतूक असलेल्या रस्त्यावर घडला. सागर शिंदे हा रक्ताच्या थारोळ्यात त्याच ठिकाणी पडला. आरोपी हे बीआरटी ओलांडून फरार झाले आहेत.

त्यांचा शोध सांगवी पोलीस घेत असून घटनास्थळी पोलिसांचा फौज फाटा दाखल झाला. घटनास्थळी पिस्तुलातून झाडण्यात आलेल्या गोळ्यांच्या दोन पुंगळ्या मिळालेल्या आहेत. त्यामुळे सागर शिंदे याच्यावर गाडीत देखील गोळीबार झाल्याचं बोललं जातं आहे. भर दिवसा घडलेल्या या घटनेमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. अशा प्रकारे आरोपींकडे पिस्तूल येतात कुठून असा प्रश्न विचारला जात आहे. भर दिवसा घडलेल्या घटनेमुळे पिंपरी- चिंचवड शहरातील नागरिक सुरक्षित आहेत का? असाही प्रश्न उपस्थित होतो आहे. हत्येच्या गुन्ह्यातील मुख्य सूत्रधार योगेश जगताप याला गुंड विरोधी पथकाने अवघ्या काही तासातच ताब्यात घेतलं आहे. हत्येच्या घटनेमुळे अवघ पिंपरी- चिंचवड शहर हादरले होते. अद्याप हत्येचं कारण समोर आलेलं नाही.